# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली.

## जाहिरात

जाहिरात क्रमांक:- FAO/ /२०२५ दिनांक :- १८/०८/२०२५

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली करीता अंतर्गत लेखापरिक्षक पद मानधन तत्वावर भरण्याकरीता पात्र उमेदवारांकडून विहीत नमून्यात अर्ज मागविण्यात येत आहे.

| पदनाम | पदसंख्या | मानधन (Fees) | नियुक्तीचा कालावधी |
|---|---|---|---|
| अंतर्गत लेखापरिक्षक (internal Auditor) | २ | प्रति माहे रू. ३०,००० ते ५०,०००/-* | ११महिने ** |

वरील पदाकरीता आवश्यक शैक्षणिक व संगणकीय अर्हता, अनुभव, वय ईत्यादी बाबतची माहिती तसेच अर्जदारासाठी आवश्यक सुचना आणि आवेदन पत्राचा विहीत नमुना विद्यापीठाच्या **www.unigug.ac.in** या संकेतस्थळावर **Recruitment Tab** मध्ये उपलब्ध आहे. अर्जाच्या विहीत नमुन्यातच अर्जदाराने **वित्त व लेखा विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली** यांचेकडे **दिनांक** १५/०९/२०२५ रोजी सायंकाळी ०५.३० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत अर्ज सादर करणे बंधनकारक आहे.

* पात्रता व अनुभव तसेच मुलाखत या आधारे मानधन ठरविण्यात येईल.

** सदर कालावधी कमी किंवा वाढविण्याचा अधिकार प्रशासनाला राहील

स्वा..

**(वित्त व लेखा अधिकारी)**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**"अंतर्गत लेखापरीक्षक" पद मानधन तत्वावर भरण्याकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता व आवश्यक सुचना.**

| अ.क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| ०१ | अंतर्गत लेखापरीक्षक<br>(Internal Auditor) | महालेखाकार कार्यालयातील सेवानिवृत्त वर्ग-१ चा अधिकारी<br>किंवा<br>सनदी लेखापाल (CA-Final Exam Passed)<br>किंवा<br>CA-Inter passed plus Experience of 3 Years |

**वरील पदांकरीता आवश्यक वयोमर्यादा व सर्वसाधारण सुचना खालील प्रमाणे.**

- **वयोमर्यादा**

  १. सेवानिवृत्त कर्मचारी व सी.ए. यांचे करीता वयाची अट लागु नाही.

- **अर्जदारांसाठी सर्वसाधारण सूचना**

  उमेदवारांनी आपले अर्ज भरण्याआधी व पाठविण्यापूर्वी शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय इत्यादी वरील बाबी पडताळून पाहाव्यात तसेच खालील सूचना व अटींचे लक्षपूर्वक वाचन करावे.

१) **अंतर्गत लेखापरीक्षक** हे ०२ पद एकत्रित मानधन तत्वावर ११ महिने कालावधी करीता राहील. काम समाधानकारक असल्यास / नसल्यास सदर कालावधी प्रशासनाला वाढविण्याचा किंवा कमी करण्याचा अधिकार राहील. सनदी लेखापाल (CA) यांना प्राधान्य देण्यात येईल.

२) नियुक्ती कालावधीत वित्त व लेखा विभागातील सोपविलेले काम पुर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत अधिकाऱ्यांची राहिल.

३) सदर जाहिराती मधील निवड प्रक्रिया हे विद्यापीठ प्रशासनाच्या अधिनस्त राहील.

४) सदर जाहिरातीमधील सुचनांमध्ये आवश्यकतेनुसार फेरबदल करण्याचे अधिकार विद्यापीठाने राखून ठेवलेले आहेत.

५) सदर जाहिराती मधील पदासाठी छाननीअंती पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची संख्या विचारात घेऊन मुलाखत घेण्याचा निर्णय विद्यापीठ प्रशासनाव्दारे आवश्यकतेनुसार घेण्यात येईल. सदर निर्णय उमेदवारांना बंधनकारक राहील.

६) उमेदवारांनी विद्यापीठाच्या **www.unigug.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या विहीत नमुन्यामध्येच टंकलिखीत, हस्तलिखीत किंवा संगणकिय प्रिंट केलेला अर्ज ०३ **प्रतीत(सहपत्रासह)** सादर करावा.

७) विहीत नमुन्यातील अनुक्रमांकामध्ये/रकान्यामध्ये कुठलाही बदल करू नये. अर्ज भरतांना रकाने किंवा ओळी कमी पडत असल्यास अधिकची माहिती स्वतंत्र कागदावर द्यावी व तसे अर्जात योग्य त्या ठिकाणी नमुद करावे.

८) अर्जदाराने अर्जाच्या विहीत नमुन्यात दर्शविलेल्या स्थानी स्वत:चा स्वसांक्षाकित केलेला फोटो लावावा.

९) अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय, इत्यादी आवश्यक व लागू असलेल्या प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती स्वसाक्षांकित करून जोडाव्यात. अर्जासोबत मुळ प्रमाणपत्रे जोडू नयेत.

१०) सदर पदाकरीता अर्ज करतांना लिफाफ्यावर "**अंतर्गत लेखापरीक्षक**" या पदाकरीता अर्ज असे लिफाफ्यावर लिहून दिनांक १५/०९/२०२५ रोजी सायं. ०५.३० वाजेपर्यंत **"वित्त व लेखा विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली पिन ४४२६०५"** यांच्याकडे उपरोक्त नमुद केलेल्या तारखेपर्यंत प्राप्त होणे आवश्यक आहे.

११) अपूर्ण, चुकीची माहिती भरलेले, विहीत नमुन्यात नसलेले, आवश्यक शैक्षणिक अर्हता नसलेले, वयोमर्यादेत मोडत नसलेले, अर्जासोबत अर्हता, अनुभव, वय, इत्यादींच्या छायांकित स्वसाक्षांकित नसलेल्या प्रती, न जोडलेले अर्ज, टपाल खात्याच्या दिरंगाईमुळे अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव उशीरा प्राप्त झालेले अर्ज, इत्यादी त्रुटी असलेले अर्ज तसेच सर्व प्रमाणपत्रासह ०१ प्रतीमध्ये नसलेले अर्ज नाकारण्यात येतील व त्याबाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

१२) अर्जदाराची शैक्षणिक पात्रता व वय हे अर्ज सादर करण्याच्या अंतिम तारखेपर्यंत ग्राह्य धरण्यात येईल.

१३) उमेदवार हा शारिरीकदृष्ट्या सक्षम असावा. तसेच अर्जदाराविरुद्ध कोणताही फौजदारी गुन्हा झालेला नसावा.

१४) अर्जाच्या छाननी अंती अर्जदार अपात्र ठरल्यास याबाबतची माहिती संबंधीत अर्जदारास स्वतंत्ररित्या कळविली जाणार नाही.

१५) उमेदवारांनी भरती प्रक्रियेत विद्यापीठाशी संबंधीत अधिकारी व सेवकांवर कोणत्याही प्रकारचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष दडपण तथा राजकिय किंवा सामाजिक दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास अथवा अप्रत्यक्ष संपर्क साधण्याचा प्रयत्न केल्यास, अशा उमेदवारास अपात्र समजले जाईल.

१६) मुलाखतीस बोलविलेल्या अर्जदारांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

१७) विद्यापीठ प्रशासनाव्दारे आयोजित मुलाखतीस पाचारण करण्यात येणाऱ्या संबंधीत उमेदवाराची ठराविक दिवशी प्रशासनाच्या कोणत्याही अडचणीमुळे मुलाखत पार न पडल्यास अशा संबंधीत उमेदवारांची प्रशासनाच्या निर्देशान्वये इतर दिवशी मुलाखत आयोजित करण्यात येईल व त्याकरीता मुलाखतीस संबंधीत उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

१८) निवड प्रक्रिया सूरू झाल्यानंतर किंवा नियुक्ती उपरांत उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे सादर केल्याचे किंवा माहिती लपवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची निवड/नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल व तो उमेदवार कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

१९) अर्जदाराला अर्जामध्ये दिलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्यात बदल करावयाचा असल्यास याबाबत वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना त्वरीत कळवावे लागेल.

२१) निवड झालेल्या उमेदवारांना गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथील कायम सेवेकरीता हक्क सांगता येणार नाही.

दिनांक :- १८/०८/२०२५
ठिकाण :- गडचिरोली.

(वित्त व लेखा अधिकारी)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(फक्त कार्यालयीन उपयोगासाठी)

अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रमांक व दिनांक -------/-----------

## अर्जाचा विहीत नमूना

(कृपया अर्ज भरण्यापूर्वी अर्जदाराने जाहिरातीतील सर्वसाधारण सूचना लक्षात घ्याव्या)

**अर्जदारांसाठी महत्वाच्या सूचना**

१. अर्जदाराने विद्यापीठाच्या संकेतस्थळा वरून उपलब्ध असलेल्या अर्जाचा विहीत नमूना डाऊनलोड करून सदर नमुन्यातच हस्तलिखीत, टंकलिखीत किंवा संगणकावर प्रिंट करून अर्ज सादर करावा व तसेच करतांना विहीत नमुन्यात कुठल्याही प्रकारचा बदल करूनये अन्यथा अर्ज रद्द केल्या जाईल याची कृपया अर्जदाराने नोंद घ्यावी.

२. विहीत नमुन्यात अर्ज सादर करतांना रकाने किंवा ओळी कमी पडत असल्यास अधिकची माहिती स्वतंत्र कागदावर द्यावी व तसे अर्जात योग्य त्या ठिकाणी नमूद करावे.

प्रति,
FAO
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
ता. जि. गडचिरोली. ४४२६०५

येथे अर्जदारने स्वत:चा पासपोर्ट साईज फोटो लावावा व स्वत:ची स्वाक्षरी करावी.

Sub: Application for the post of Internal Auditor

मा. महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून, मी खालीलप्रमाणे माहिती सादर करीत आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | अर्जदाराचे संपूर्ण नांव | आडनांव | नांव | वडीलांचे/पतीचे नांव |
| | | | | |
| २. | पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता | ----------------------------------------<br>----------------------------------------<br>----------------------------------------<br>----------------------------------------<br>----------------------------------------<br>----------------------------------------<br>--------------------पिनकोड | | |
| ३. | कायमचा संपूर्ण पत्ता | ----------------------------------------<br>----------------------------------------<br>----------------------------------------<br>----------------------------------------पिनकोड | | |
| ४. | ई-मेल | | भ्रमणध्वनी क्र. | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५. | जन्मतारीख | D | D | M | M | Y | Y | Y | Y |
| | अंकात | | | | | | | | |
| | अक्षरात | | | | | | | | |
| | दि. ३१/०३/२०२४ रोजी वय | वर्ष | | | महिणे | | | दिवस | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६. | राष्ट्रीयत्व | | स्त्री/पुरूष | | विवाहीत/अविवाहीत | |

७. शैक्षणिक अर्हता(Educational Qualification)

| | उत्तीर्ण परिक्षा | शैक्षणिक संस्था/मंडळ/ विद्यापीठाचे नांव | उत्तीर्ण वर्ष | टक्केवारी | मुख्य विषय |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

८. संगणक अर्हता (Computer Literacy)

| उत्तीर्ण परिक्षा | उत्तीर्ण झाल्याचा महिना व वर्ष | गुणांचीटक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|
| MS-CIT | | | |
| इतर संगणक अर्हता (असल्यास) | | | |

९. अनुभव (Experience)

| संस्थेचे नांव | धारण केलेले पद | वेतनश्रेणी | सेवेचा कालावधी | | अनुभव | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत | वर्ष | महिने | दिवस |
| | | | | | | | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

| | |
|---|---|
| १०. | इतर आवश्यक माहितीचा तपशिल(असल्यास) |
| | |
| ११. | सहपत्रे (Enclosures) |

| अ.क्र. | सहपत्राचे नांव | सहपत्र क्रमांक | अ.क्र. | सहपत्राचे नांव | सहपत्र क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | ६ | | |
| २ | | | ७ | | |
| ३ | | | ८ | | |
| ४ | | | ९ | | |
| ५ | | | १० | | |

## प्रतिज्ञापत्र

मी असे प्रमाणित करतो/करते की, ह्या अर्जात दिलेली माहिती खरी असून त्यापृष्टर्थ मी मुलाखतीचे वेळी प्रमाणपत्राच्या मुळ प्रती सादर करीन. मी आणखी असेही प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी असल्याचे आढळून आल्यास माझ्याविरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल तसेच या माहितीच्या आधारे होणारी शिफारस / नियुक्ती रद्दबातल होईल याची जाणीव आहे. त्यासंबंधीचा नियुक्ती प्राधिकाऱ्याचा निर्णय माझ्यावर बंधनकारक राहील आणि त्यासंबंधी माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

ठिकाण:-

दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी:-

अर्जदाराचे नांव:-